आंतरजिल्हा बदलीने नेमणुक देणेबाबत.
श्री.संजय विठठल लेंडे
पशुधन पर्यवेक्षक पंचायत समिती नंदुरबार
जिल्हा-नंदुरबार

जिल्हा परिषद अहिल्यानगर
पशुसंवर्धन विभाग//
जिल्हा परिषद आदेश क्रमांक/पसं/आस्था-१/५१७/२०२५
दिनांक- १० / ११ /२०२५

वाचा - १. महाराष्ट्र शासन जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम ६ (८)
२. मा.कक्ष अधिकारी, ग्रा.वि.व ज.सं.विभाग महा.शासन मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.जिपब-७११/प्र.क्र.११३/११ आस्था-१४ दि. २९ सप्टेबर २०११
३. मा.उपसचिव, ग्रा.वि.व ज.सं.विभाग महा.शासन मुंबई यांचेकडील शासन शुद्धीपत्रक क्र.न्यायप्र-०५१२/प्र.क्र.११८/१२ आस्था-१४ दि.१८/१०/२०१२
४. मा.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार यांचेकडील पत्र जा.क्र. जिपन/पंस/आ-२/आं.जि.ब/२९२/२०२४ दिनांक १८/१२/२०२४

महाराष्ट्र शासन जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम ६ (८) च्या तरतुदीस अधिन राहुन व शासनाचे संदर्भीय परिपत्रक क्र.२ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारा नुसार मी,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, खालील पशुधन पर्यवेक्षक गट - क यांची वेतनश्रेणी एस ८ - रुपये २५५००-८११००/- मध्ये त्यांच्या नावापुढे रकाना क्रमांक ६ व ७ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी आंतरजिल्हा बदलीने खालील अटी व शर्तीचे अधिन राहुन पदस्थापना देणेत येत आहे.

| अ.क्र. | पशुधन पर्यवेक्षकाचे नांव | कार्यरत ठिकाण | | | आंतरजिल्हा बदलीने दिलेले नेमणुकीचे ठिकाण | | | निवडीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पदैद ठिकाण | पंचायत समिती | जिल्हा परिषद | पदैद ठिकाण | पंचायत समिती | जिल्हा परिषद | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | श्री.संजय विठठल लेंडे पशुधन पर्यवेक्षक | पंचायत समिती नंदुरबार | नंदुरबार | नंदुरबार | विरगाव | अकोले | अहिल्यानगर | भजक प्रवर्ग एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने |

<u>अटी व शर्ती –</u>

१. अहिल्यानगर जिल्हा परिषदेकडे सेवेत असलेल्या पशुधन पर्यवेक्षकाचे जेष्ठता यादीत त्यांची सेवाजेष्ठता ते ज्या तारखेपासुन जिल्हा परिषद अहिल्यानगरकडे सेवेत हजर होतील त्या तारखेपासुन कनिष्ठतम धरणेत येईल.
२. अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या आंतरजिल्हा बदली बाबतच्या अटी व शर्ती असतील त्या त्यांना बंधनकारक राहतील.
३. अहिल्यानगर जिल्हा परिषदेतील कोणत्याही पंचायत समितीवर किंवा पशुवैद्यकीय दवाखान्यावर काम करावे लागेल.
४. श्री.संजय विठ्ठल लेंडे पशुधन पर्यवेक्षक यांना जिल्हा परिषद नंदुरबार यांनी कार्यमुक्त केल्यानंतर या जिल्हा परिषदेमध्ये रुजू होण्यासाठीचा वाटचाल कालावधी, दैनिक भत्ता, प्रवास भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.
५. श्री.संजय विठ्ठल लेंडे पशुधन पर्यवेक्षक यांची नियुक्ती जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत भजक प्रवर्गातून ( एकतर्फी ) करण्यात येत आहे.
६. जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत त्यांची नेमणूक तात्पुरत्या स्वरूपाची राहील.
७. नेमणुकी बाबत व सेवाशर्ती बाबत शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश त्यांना बंधनकारक राहतील.
८. जिल्हा परिषद नंदुरबार येथील त्यांचेकडील कोणतेही कर्ज, अग्रीमाची थकबाकी, वसुल करण्याची जबाबदारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांची राहणार नाही.
९. जिल्हा परिषदेची नोकरी सोडण्याची झाल्यास एक महिन्याची आगाऊ नोटीस द्यावी लागेल अथवा एक महिन्याचे वेतन जमा करावे लागेल.
१०. महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक २९ सप्टेबर २०१२ मधील तरतुदी त्यांना लागु राहतील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या **www.nagarzp.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक 202511101110065 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 10-11-2025 19:34:24
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति, श्री.संजय विठ्ठल लेंडे पशुधन पर्यवेक्षक
द्वारा –गट विकास अधिकारी पंचायत समिती अकोले जिल्हा अहिल्यानगर

प्रतिलिपी - योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी व माहीतीसाठी.
१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार
२. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार / अहिल्यानगर
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद नंदुरबार / अहिल्यानगर
४. गटविकास अधिकारी पंचायत समिती नंदुरबार
५. गटविकास अधिकारी पंचायत समिती अकोले जिल्हा अहिल्यानगर